**विशेष खटला क्र. १६/२०२१** **निशाणी क्र. ४५**

**सरकार पक्षातर्फे साक्षीदार क्र. १ यांचा जबाब**

मी, सत्य प्रतिज्ञेवर असे कथन करतो की,

| | | |
|---|---|---|
| **माझे नाव** | :- | राधाकिसन रामराव गायकवाड |
| **वय** | :- | ५० वर्षे |
| **व्यवसाय** | :- | व्यापार |
| **राहणार** | :- | दत्तनगर ता. श्रीरामपूर जि. अहमदनगर. |

**सरतपास सरकार पक्षातर्फे श्री. पी.पी. गटणे सहा. सरकारी अभियोक्ता यांचेकडून** :-

१. माझे दुकान लक्ष्मी ट्रेडर्स नावाने दत्तनगर येथे आहे. ज्योती माझी पत्नी आहे. दि. १३/११/२०१९ रोजी हरिदास टॅक्स कन्सल्टन्ट याचा मला जी.एस.टी. भरा म्हणून फोन येत होता. जी.एस.टी. माझ्या पत्नीच्या नावाने होता. मी त्यांना भेटलो असता सातबारावर बोजा चढवू अशा धमक्या देत होते. मी त्यांना दुकानबंद करायचे आहे जी.एस.टी चा नंबर बंद करायचा आहे, त्याकरिता काय करावे लागेल असे विचारले. मी ते निलेश हरिदास यांना विचारले. त्यांनी त्याकरिता एक ते दिड लाख रूपये भरावे लागतील असे सांगितले. त्यांनी ते प्रकरण चार ते पाच हजारात मिटवून देतो असे सांगितले. त्यामुळे मी त्यांची ॲन्टीकरप्शनकडे तक्रार केली. हरिदास हे पैसे मागतात अशी ॲन्टीकरप्शनकडे तक्रार केली. हरिदास म्हणाले टकले साहेब यांना पैसे दयावे लागतील. ते विक्रीकर निरिक्षक आहेत. दि. १३/११/२०१९ रोजी सकाळी अकाराच्या सुमारास थत्ते ग्राउंडवर ॲन्टीकरप्शनचे खेडकर, पवार , चौधरी आणि इतर स्टाफ आले. त्यांनी तेथे माझे नाव विचारले. त्यांना मी तक्रार सांगितली. आता मला ती तक्रार दाखवली ती मी सांगितलेली असून त्यावर माझी सही व पोलिस निरीक्षक यांची सही आहे. ती तक्रार मी सांगितल्या प्रमाणे आहे. त्यास **नि. ४६** देण्यात येत आहे. माझ्या गळयामध्ये व्हॉइस रेकॉर्डर दिला. तेथे पंच आले होते.

२. मी व पंच त्याचे नाव नक्की आठवत नाही असे नगरपालिकेकडे असणा-या हरिदास यांच्या ऑफिसमध्ये गेलो. तेथे हरिदास व माझी चर्चा झाली. त्यांनी मला पाच हजार रूपये सांगितले होते. त्यावेळी टकलेसाहेबांसाठी साडेतीन हजार रूपये व हरिदास साहेबांसाठी पाचशे रूपये असे एकूण चार हजार रूपये ठरले. आम्ही तो व्हॉइस रेकॉर्डर घेउन थत्ते ग्राउंडवर गेलो. त्यांनी व्हॉइस रेकॉर्डरची चीप काढून घेतली व कॉम्प्युटरला जोडली व कॉपी करून घेतली. त्यांनी पाचशेच्या आठ नोटा माझयाकडून घेतल्या व थत्ते ग्राउंडवर गाडीमध्येच त्या नोटांना पावडर

लावली. त्यांनी त्या नोटा माझया खिशात टाकल्या. त्यानंतर त्यांनी माझयाबरोबर शेडाळे पंच दिले. व्हॉइस रेकॉर्डर परत माझया गळयामध्ये दिला. पहिल्यावेळेस शेडाळे हाच पंच माझया बरोबर होता.

३. त्यानंतर आम्ही हरिदास यांच्या ऑफिसला गेलो. तेथे ते नव्हते म्हणून त्यांना आम्ही फोन केला. ते फोन वर म्हणाले पाच मिनिटे बसा मी आलो. त्या आल्यानंतर मी त्यांना पैसे दिले. साहेबांनी मला पैसे दिल्यानंतर डोक्याला हाथ लावायचा अशी सूचना दिली होती. मी पैसे दिल्यानंतर डोक्याला हाथ लावला. त्यानंतर हरिदास यांना खेडकर साहेबांनी व स्टाफने पकडले. त्यांना पकडून गेस्ट हाउसला घेउन गेले. हरिदास यांच्या ऑफिसलाच व्हाइस रेकॉर्डर माझयाकडून काढून घेतला. मी, एसीबी स्टाफ हरिदास गेस्ट हाउसला गेलो. तेथे पोलिस कारवाई चालू झाली. या घटनेची मी पोलिस स्टेशनला फिर्याद दिली. आता मला ती फिर्याद दाखवली त्यावर माझी सही आहे त्यातील मजकूर मी सांगितल्याप्रमाणे बरोबर आहे त्यावर पो. नि. शाम पवळे यांची सही आहे त्यास **नि. ४७** देण्यात येत आहे. मी फिर्याद हरिदास आणि सुनिल टकले यांच्या विरोधात दाखल केली. नि. ४६ च्या तक्रारी बरोबर मी जी.एस.टीच्या प्रमाणपत्राची प्रिंट दिली होती. आता मला ती प्रिंट दाखवली ती मीच दिलेली आहे त्यास **नि. ४८** देण्यात येत आहे. पोलिसांनी माझया आवाजाचा नमुना घेतला होता. मला त्या नोटा दाखवल्या तर त्या मी ओळखू शकतो. आता मुद्देमालातील सिलबंद पाकिट दोन्ही आरोपीचे वकिल, सरकारी वकील हजर आरोपी सुनिल टकले त्यांच्या देखत सिल असल्याची खात्री केल्यानंतर उघडले, त्यात कागदात गुंडाळलेल्या पाचशे रूपयाच्या आठ नोटा मिळून आल्या. त्याच नोटा मी हरिदासला दिल्या होत्या. त्या नोटांना एकत्रित **आर्टिकल अ** देण्यात येते. आज आरोपी टकले हजर आहे. हरिदास यास मी ओळखू शकतो.

**<u>उलटतपास आरोपी क्र. १ तर्फे विधीज्ञ श्री. आर.एन. खंडाळ यांचेकडून</u> :-**

४. हे म्हणणे खरे नाही की, मी जाणूनबूजून आरोपी नं. १ विरूध्द खोटी फिर्याद दिली व खोटी साक्ष देत आहे.

**आरोपी नं. २ च्या अर्जावरून उलटतपास पुढील तारखेपर्यंत तहकुब.**

श्रवणोत्तर स्विकृती,

SHRIPAD SHARAD DESHPANDE
Digitally signed by SHRIPAD SHARAD DESHPANDE
Date: 2025.11.06 15:24:06 +0530

**(एस. एस. देशपांडे)**
अतिरिक्त सत्र न्यायाधीश
श्रीरामपूर

दिनांक : ०५/ ११/२०२५